# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# बोर्ड परिक्षांच्या धर्तीवर अधिकाऱ्यांच्या शाळा भेटी



पाटण : बोर्ड परिक्षा केंद्रावर भेटी देताना अधिकारी.

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**पाटण, दि. ११ :** पाटण तालुक्यात इयत्ता दहावी व बारावी परीक्षेसाठीचे नियोजन सोपान टोम्पे प्रांताधिकारी, अनंत गुरव तहसीलदार, दीपा बोरकर गटशिक्षणाधिकारी, विजय पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी पाटण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

पाटण तालुक्यात बारावीची ४ व दहावीची १० परीक्षा केंद्र आहेत. आजपासून इयत्ता १२ वी परीक्षा सुरु झालेली आहे. अनंत गुरव तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यात एकूण १४ बैठे पथक व २ भरारी पथक स्थापन केली आहेत.

आज इंग्रजीच्या पेपरसाठी तालुक्यातील ...(पान २ वर)

## बोर्ड परिक्षांच्या धर्तीवर अधिकाऱ्यांच्या शाळा भेटी

बाळासाहेब देसाई कॉलेज व क्षेत्रपाल विद्यालय अडुळ या दोन सेंटर वर सोपान टोंपे, प्रांत अधिकारी, अनंत गुरव तहसीलदार, विजय पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी, अविनाश कवठेकर पोलीस निरीक्षक पाटण, दीपा बोरकर गटशिक्षणाधिकारी, पं. स. पाटण यांनी भेटी दिल्या. परीक्षा केंद्रावर ड्रोन वरुन शूटिंग करण्यात आले.